# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

## कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभाग

# प्रधान मंत्री मातृ वंदना योजना

### आरोग्यदायी राष्ट्राची उभारणी- सुरक्षीत जननी विकसीत धारीणी

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेमध्ये कुटुंबातील पहिल्या जिवंत अपत्या पर्यंत त्या महिलेला एकूण ५,०००/- ( रु. पाच हजार ) चे आर्थिक सहाय्य टप्प्या टप्प्याने दिले जाते.

| टप्पा | अट | रक्कम |
|---|---|---|
| पहिला | गरोदरपणाची लवकरात लवकर १०० दिवसांच्या आत नोंदणी झाल्यानंतर. | रु. १,०००/- |
| दुसरा | गरोदरपणाच्या ६ महिन्यात ( १८० दिवस ) किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी केलेली असल्यास. | रु. २,०००/- |
| तिसरा | बाळाचे जन्मनोंद प्रमाणपत्र तसेच बाळाला १४ आठवड्यापर्यंतचे प्राथमिक लसीकरण पूर्ण झाल्याची नोंद | रु. २,०००/- |



### लाभ मिळण्यासाठी आवश्यक बाबी :

१ ) लाभार्थी व तिच्या पतीचे आधार कार्ड
२ ) लाभार्थीचे आधार संलग्न बँक खाते
३ ) गरोदरपणाची शासकिय आरोग्य संस्थेत १०० दिवसांचे आत नोंद
४ ) शासकिय संस्थेत प्रसूतीपूर्व तपासणी
५ ) बाळाचा जन्मनोंदणी दाखला व प्राथमिक लसीकरण

या व्यतिरिक्त जननी सुरक्षा योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना शासकिय संस्थेमध्ये तसेच शासन मान्य रुग्णालयात बाळंतपण झाले असल्यास मिळणारे आर्थिक सहाय्य देखील देय राहील.

''प्रधानमंत्री मातृवंदना योजना आहे खास, सुरक्षित मातृत्वाचा देऊ विश्वास''

### अधिक माहितीसाठी :

योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कार्यक्षेत्रातील जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.